**MHSI06-000880-2026** | **सं.फौ.खटला क्र. ४४८/२०२६**

**निशाणी क्र. ३**

**श्रीमती जे.एम. मिस्त्री, न्यायदंडाधिकारी प्र.वर्ग, सावंतवाडी यांचे न्यायालयात**

१. अपराध घडल्याची तारीख : ०१/०८/२०२६

२. फिर्याद दाखल केल्याची तारीख : ०४/०८/२०२६

३. फिर्यादीचे नाव, वय व पत्ता : मयुर भोजु सावंत, पो.हवा./४५२,
नेमणुक–सावंतवाडी पोलिस स्टेशन.

४. आरोपीचे नाव, वय व पत्ता : सचिन बाळासो पवार,
वय : ३८ वर्षे, धंदा ––
रा. वालवेकर नगर, हुपरी,
ता. हातकणंगले, जि. कोल्हापुर.

५. गुन्हयाचा तपशील :

ज्याअर्थी तुम्ही दि.०१/०८/२०२६ रोजी १६.३६ वाजताचे दरम्यान आंबोली ते सावंतवाडी जाणारे सार्वजनिक रस्त्यावर सातोळी तिठा येथे तुमच्या ताब्यातील महिंद्रा व्हेरीटो वाहन क्र. एम्. एच्.०९/सी. एम्–०२६६ हे वाहन सावंतवाडी ते आंबोली असे दारुचे सेवन करुन चालवीत असताना आढळुन आल्याने तुम्हास थांबवुन ब्रेथ ॲनालायझर मशिनने चेक केले असता तुम्ही दारुच्या अंमलाखाली वाहन चालविताना मिळुन आलात आणि म्हणून तुम्ही मोटार वाहन कायदयाचे कलम १८५ प्रमाणे शिक्षापात्र असलेला व या न्यायालयाचे दखलगिरीतील गुन्हा केला.

५(ब).कलम व अधिनियम :– मोटार वाहन कायदयाचे कलम १८५ अन्वये

**आरोपीचा जबाब–**

प्रश्न १. तुम्हाला पोलीस पेपर्सच्या नकला मिळाल्या काय?

उत्तर : होय.

प्रश्न २. तुमच्याविरुध्द दाखल केलेला गुन्हा तुम्हास मराठीतून वाचून व समजावून सांगण्यात आला तो तुम्हास समजला काय?

उत्तर : होय.

प्रश्न ३. तुम्हास गुन्हा कबूल आहे काय?

उत्तर : होय. मला गुन्हा कबूल आहे.

आरोपीची सही

समक्ष,

सही/-

**(जा.म. मिस्त्री)**

**दिनांक - ०४/०८/२०२६** **न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग**

**सावंतवाडी.**

**<u>आदेश</u>**

**(पारीत केला दि.०४/०८/२०२६)**

१. आज रोजी आरोपी माझेसमोर हजर झाला. त्याने अर्ज दाखल करुन गुन्हा कबूल करीत आहे असे कथन केले आहे. पुढे त्याने अर्जामध्ये कमीत कमी दंडावरती मुक्तता करण्यात यावी, अशी विनंती केली आहे. त्याने केलेला गुन्हा हा त्याचा पहिलाच गुन्हा आहे.

२. वरील सर्व बाबी विचारात घेता व आरोपीविरुध्दच्या खटल्याचे स्वरुप विचारात घेता, न्यायाचा अंतिम हेतू साध्य करण्याकरिता खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

**<u>आदेश</u>**

१. आरोपी सचिन बाळासो पवार यास भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम २७५ अन्वये मोटार वाहन कायद्याचे कलम १८५ प्रमाणे गुन्ह्याकरिता दोषसिद्ध ठरविण्यात येत आहे.

२. आरोपीला मोटार वाहन कायद्याचे कलम १८५ अन्वये खालील गुन्हयाकरिता रक्कम रु.१०,०००/- (अक्षरी रुपये दहा हजार फक्त) दंड भरण्याची तसेच दंड न भरल्यास ३ (तीन) दिवस साध्या कारावासाची शिक्षा सुनावण्यात येते.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)

JAHEDA MOHMED MISTRY
Digitally signed by JAHEDA MOHMED MISTRY
Date: 2026.08.04 17:24:20 +0530

**(जा.म. मिस्त्री)**

**दिनांक – ०४/०८/२०२६** **न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग**

**सावंतवाडी.**